CCPS An AIChE Technology Alliance Center for Chemical Process Safety

Process Safety Beacon

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx

उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

CCPS च्या समर्थकांकडून प्रायोजित

# समावेशक भित्ती आणि पृष्ठे

जून २०१०



बऱ्याच लोकांची अशी धारणा असते की स्टोरेज टँकच्या भोवतालची टाकी, पंपांचे परस्ट तसराळी, प्रक्रीया इमारती, ट्रक आणि रेल्वे वाघीणी खाली करण्याची ठिकाणे आणि इतर सांडलवंड होण्याची संभावित ठिकाणे यांचे पृष्ठीय जल आणि जमिनीचे प्रदूषण रोखण्यातील महत्वाचे पर्यावरण संतूलन कार्य असते. परंतू आपणास हे ज्ञात आहे का की वरील सर्व गोष्टींची सुरक्षेतही महत्वाची कार्ये करतात. उदाहरणार्थ–

- आगीचा फैलाव मर्यादेत ठेवणे आणि जर एखादा ज्वालाग्राही पदार्थ सांडून पेटला असेल तर इतर उपकरणांचा त्या आगीपासून बचाव करणे.
- काही सांडलवंड झाल्यास असंयोज्य अभिक्रीयाकारक पदार्थ एकमेकांत मिसळण्यापासून रोखणे.
- सांडलेल्या दाहक पदार्थाचा विस्तार मर्यादेत ठेवणे आणि दाहक पदार्थाच्या संपर्कामुळे खराब होऊ शकणाऱ्या उपकरणाचा संपर्क रोखणे.

२००१ साली अमेरिकी रासायनिक सुरक्षा व धोके तपासणी मंडळाने (CSB) टेक्सासमधील एक पेट्रोलियमचे मिश्रण बनविणारा कारखाना पूर्णपणे उध्वस्त करणाऱ्या आगीची चौकशी केली. निकृष्ट भित्ती अभिकल्प आणि देखभालीची परीणती जळणाऱ्या द्रवाच्या पसरण्यात व आग एका टाकीतून दुसऱ्या टाकीत पसरण्यात आणि अखेरीस संपूर्ण कारखाना आगीने वेढण्यात झाली.



←रसानन साठा टाकीची सांडलवंड समावेशक भित्ती

एक उतरते सांडलवंड समावेशक पृष्ठ ज्यामुळे ट्रक रिकामा करण्याच्या ठिकाणी झालेली सांडलवंड सांडपाण्याच्या गटारात जाते. →



## आपण काय करु शकता ?

- ठराविक काळाने स्टोरेज टाक्यांच्या भोवतालच्या समावेशक भित्ती, उतरती सांडलवंड समावेशक पृष्ठे आणि सांडपाण्याची गटारे यांचा दैनंदिन सुरक्षा तपासणीमध्ये अंतर्भाव करा. काही मोडतोड, सांडलेले रसायन, समावेशक भित्तींमध्ये साठलेले पावसाचे पाणी, किंवा तुंबलेली गटारे इत्यादींवर लक्ष ठेवा. कचऱ्याचा ढिगारा, उपकरणे किंवा अन्य काही कारणाने सांडलेल्या रसायनाचा प्रवाह अडवला जात नाही ना याची खात्री करा.
- समावेशक भित्तींमधील पावसाच्या पाण्याचे पंपाने किंवा निःसारण करण्याची आपल्या संयंत्राच्या पध्दतींमध्ये तरतूद असल्याची खात्री करा – जर समावेशक भित्तीं पावसाच्या पाण्याने भरल्या असतील तर मोठ्या प्रमाणावर झालेली सांडलवंड सामावू शकणार नाही.,
- पावसाचे पाणी काढून टाकण्यासाठी पाइपलाइन किंवा व्हॉल्व्ह बसविलेला असल्यास आवश्यकता नसेल तेंव्हा बंद केला जात असल्याची खात्री करा.
- समावेशक भित्तींमधे आपण काही दुरुस्ती किंवा बांधकाम केल्यावर समावेशक भित्तींची काही तोडमोड झाली असल्यास बांधकाम पूर्ण करण्यापूर्वी त्यांची दुरुस्ती करा.



- समावेशक भित्तींमधील एक छिद्र बाणाने दर्शविले आहे. समावेशक भित्तीच्या तळाशी तसेच वरच्या भागाचेही नुकसान झालेले दिसत आहे.
- समावेशक भित्तींमधील नुकसानींची अन्य उदाहरणे म्हणजे भिंती किंवा पृष्ठभागामधील तडे, जेथे पाइप्स बसविले जातात तेथील छिद्रे आणि अन्य कोणतीही गोष्ट ज्यामुळे सांडलेले रसायन बाहेर वाहून जाऊ शकेल.

**आपल्या समावेशक भित्तींची पाहणी करा व त्यांची निगा राखा**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org or २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.